महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : ३१ ■ जानेवारी २०२६ ■ पाने : ८

# ग्राहकांची सेवा हेच महावितरणचे उद्दिष्ट

**मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात व्यापक परिवर्तन चालू आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी काळाची पावले ओळखून रिन्युएबल एनर्जीच्या वापरावर भर दिला आहे. त्यामुळे महावितरणचा वीज खरेदी खर्च पाच वर्षात ८२,००० कोटी रुपये इतका वाचणार आहे. परिणामी राज्याच्या इतिहासात प्रथमच वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोर मांडला. एकीकडे महावितरणला तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पावले टाकतानाच राज्यातील वीज ग्राहकांना अधिकाधिक चांगली सेवा मिळण्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनात काम सुरू आहे.

सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे, यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भर आहे. नागरिकांना सरकारी कार्यालयात यावे लागू नये तर त्यांना घरबसल्या ऑनलाईन सेवा मिळाल्या पाहिजेत, यासाठी काम करण्याची त्यांची स्पष्ट सूचना आहे. मला आनंद आहे की, महावितरणने गेल्या अडीच तीन वर्षात घरगुती वीज ग्राहक, शेतकरी आणि उद्योजक या सर्वांना अधिकाधिक चांगली सेवा देण्यासाठी आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा केल्या आहेत.

**नावात बदल, नवे कनेक्शन... सर्व ऑनलाईन**

महावितरणने आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून वीज ग्राहकांच्या सोईसाठी नुकत्याच काही महत्त्वाच्या सुधारणा केल्या. विजेच्या वाढत्या वापरामुळे ग्राहकांची गरज वाढली आहे. वाढत्या उत्पादनामुळे आणि विस्तारणाऱ्या व्यवसायामुळे औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांनाही अधिक वीजभाराची गरज वाटते. आतापर्यंत मंजूर भार वाढविण्यासाठी ग्राहकांना महावितरणकडे अर्ज करून पाठपुरावा करावा लागत होता. पण आता ही प्रक्रिया स्वयंचलित केली आहे. ग्राहकाने ऑनलाईन अर्ज भरून प्रक्रिया पूर्ण केली की ताबडतोब मंजूर भार वाढविला जातो. त्यासाठी ग्राहकाला महावितरणच्या कोणत्याही कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची गरज नाही.

जुन्या घराची खरेदी केली की वीज कनेक्शनच्या नावात बदल करून घ्यावा लागतो. अशा प्रकारे अन्य काही कारणांनीही वीज ग्राहकांना कनेक्शनच्या नावात बदल करून घ्यावा लागतो. आता ही प्रक्रियाही स्वयंचलित केली आहे. नावात बदलासाठी ऑनलाईन अर्ज केला की, पुढे मंजुरी गतीने होते आणि नियमात बसत असेल तर तातडीने कनेक्शनच्या नावात बदल होतो. नव्या वीज कनेक्शनची प्रक्रियाही आता आपण पूर्णपणे ऑनलाईन आणि गतीमान केली आहे. यामध्ये वीज कनेक्शन देण्याच्या प्रत्येक टप्प्यावर माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे देखरेख करण्यात येत असल्याने विलंब झाला तर तो कोठे व कोणामुळे झाला हे स्पष्ट होते. या सुधारणेमुळे नवीन वीज कनेक्शन देण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेली कालमर्यादा तंतोतंत पाळणे शक्य झाले आहे. ग्राहक सेवेच्या दृष्टीने या सुधारणा महत्त्वाच्या आहेत. त्याचा आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर ग्राहकांना लाभ झाला आहे.

**हितगुज**



**लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**शेतकऱ्यांच्या सेवेसाठी महावितरण**

राज्यातील ४५ लाख कृषिपंपांना दिवसा आणि भरवशाचा वीज पुरवठा व्हावा यासाठी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० महावितरण राबवत आहे. या योजनेत १६,००० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारून त्यावर कृषी फीडर्स चालविण्यात येणार आहेत. ही जगातील सर्वात मोठी विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती योजना असून तिचे काम चालू आहे. आतापर्यंत आपण चांगली कामगिरी केली आहे व त्याचा लाभ हजारो शेतकऱ्यांना झाला आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या क्रांतिकारी योजनेसोबत मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेतून शेतामध्ये ऑफ ग्रीड सोलर पंप बसविण्याच्या बाबतीत तर महावितरणने जागतिक विक्रम केला आहे. एका महिन्यात ४५,९११ सौर कृषी पंप बसवून महावितरणने गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळविले आहे. या दोन्ही योजनांच्या बाबतीत २०२६ हे वर्ष महत्त्वाचे आहे. आपल्याला मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चे काम या वर्षात पूर्णत्वाला न्यायचे आहे तसेच राज्यात बसविलेल्या सौर कृषी पंपांच्या बाबतीत मा. मुख्यमंत्र्यांनी ठेवलेले दहा लाखाचे उद्दिष्ट गाठायचे आहे. या दोन्ही योजना राज्यातील शेती सुजलाम सुफलाम करणाऱ्या आहेत व शेतकऱ्यांचे कल्याण करणाऱ्या आहेत.

**उद्योगांच्या सेवेसाठी**

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर्सची करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासाठी निश्चित केलेल्या पाच ट्रिलिअन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टाशी सुसंगत अशी महाराष्ट्राची वाटचाल आहे. राज्याच्या आर्थिक भरारीसाठी उद्योगांची वाढ मोठ्या प्रमाणात आवश्यक असून त्यासाठी वीज पुरवठा ही प्राथमिक अट आहे. त्या दृष्टीने महावितरणने खूप महत्त्वाची पावले टाकली आहेत. आगामी काळातील विजेची गरज ध्यानात घेऊन पुरेशा वीज पुरवठ्यासाठी करार केले आहेत. त्यासोबत उद्योजकांच्या वीज पुरवठ्याविषयीच्या समस्या सोडविण्यासाठी स्वागत सेलचे काम सुरू आहे. राज्यातील उद्योजकांच्या २७८ संस्था स्वागत सेलशी जोडल्या गेल्या आहेत. स्वागत सेलचे स्वतंत्र पोर्टल आहे. त्यावरून औद्योगिक ग्राहकांना वीज पुरवठ्याबाबतची माहिती नियमित दिली जाते. उद्योजकांच्या समस्या दूर करण्यासाठी मुख्यालयातील वरिष्ठ अधिकारी आणि मुख्य अभियंते औद्योगिक ग्राहकांशी थेट संवाद साधतात. मंजूर भार वाढविणे, नवीन कनेक्शन घेणे, नावात बदल यासाठीच्या या आधी उल्लेख केलेल्या कामांचाही उद्योगांना लाभ होत आहेच.

**वीज ग्राहकांसाठी परिवर्तन**

महावितरणने आपली संपूर्ण कार्यपद्धती अधिक सक्षम व कार्यक्षम करण्यासाठी कामाच्या विभाजनात सुधारणा केली आहे. वीज ग्राहकांना अधिकाधिक चांगली सेवा मिळावी, हाच याचा हेतू आहे. त्याबद्दल मी या स्तंभात यापूर्वी चर्चा केली आहेच. महावितरणची २०२६ ची डायरी आपल्याला मिळाली असेल. त्यामध्ये महात्मा गांधी यांचे एक वचन आहे. गांधीजी म्हणतात, ''ग्राहक कोणी परके नसून खऱ्या अर्थाने आमचे आधारस्तंभ आहेत. सेवा करण्याची संधी देऊन तेच आम्हाला उपकृत करत आहेत.'' गांधीजींचे हे वचन हेच महावितरणच्या कामाचे मार्गदर्शक सूत्र आहे. २०२६ मध्ये ग्राहकसेवेच्या उद्दिष्टासाठी पुन्हा समर्पित होऊ या. सर्वांना नव्या वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

# कर्मचारी सहभागातून महावितरणचे हरित ऊर्जेला बळ!

## छतावरील सौर प्रकल्प, ई-वाहन खरेदीसाठी आगाऊ रक्कम देणार



**केंद्र सरकारच्या** क्लीन एनर्जी मिशनला महाराष्ट्रात बळकटी देण्यासाठी महावितरणने वर्ग १ ते ४ मधील कर्मचाऱ्यांना घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आणि दोन किंवा चार चाकी विद्युत वाहन खरेदीसाठी आगाऊ रक्कम देण्याची योजना जाहीर केली आहे. या आगाऊ रकमेची संबंधित कर्मचाऱ्यांना मासिक वेतनातून परतफेड करावी लागणार आहे व येत्या दि. १ फेब्रुवारीपासून या योजनेची अंमलबजावणी सुरू होईल. विशेष म्हणजे हरित ऊर्जेद्वारे विद्युत वाहन चार्जिंग करणे सोयीचे व्हावे यासाठी विद्युत वाहन खरेदीच्या आगाऊ रकमेसाठी छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित असणे अनिवार्य करण्यात आले आहे.

घरगुती वीजग्राहकांच्या आर्थिक फायद्यासह हरित ऊर्जेला बळ देणारी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना महावितरण प्रभावीपणे राबवत आहे. तसेच नोडल एजन्सी म्हणून विद्युत वाहनांच्या चार्जिंग स्टेशन्ससाठी पायाभूत सुविधा उभारत आहे. पर्यावरणपूरक या दोन्ही योजनांमध्ये महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढवा अशी सूचना महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी केली. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या घरावर सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्यासाठी आणि विद्युत वाहनाच्या खरेदीसाठी महावितरणकडून कर्मचाऱ्यांना आगाऊ रक्कम देण्याची योजना नुकतीच जाहीर करण्यात आली आहे.

**छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प–** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट व त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान मिळत आहे. या योजनेत सहभाग घेण्यासाठी अनुदान मिळण्यापूर्वीच्या स्वखर्चासाठी महावितरण कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त ९० हजार रुपयांपर्यंत प्रतिकिलोवॅट ३० हजार रुपये आगाऊ स्वरुपात मिळणार आहेत. यात १ किलोवॅटसाठी ३० हजार रुपये (परतफेड-१२ महिने), २ किलोवॅटसाठी ६० हजार रुपये (परतफेड-१५ महिने) आणि ३ किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेसाठी ९० हजार रुपये (परतफेड-१८ महिने) आगाऊ स्वरूपात मिळेल. कमीतकमी ३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झालेल्या तसेच स्वतः महावितरणचे वीजग्राहक आहे, अशा वर्ग १ ते ४ मधील कर्मचाऱ्यांना या योजनेत सहभागी होता येईल.



**विद्युत वाहन खरेदी–** पर्यावरणपूरक विद्युत वाहनांच्या खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठी कर्मचाऱ्यांना दूचाकी खरेदीसाठी १ लाख रुपयांपर्यंत (परतफेड- १८ महिने) तर चारचाकी वाहनांसाठी १५ लाख रुपयांपर्यंत (परतफेड- ३६ महिने) आगाऊ रक्कम महावितरणकडून देण्यात येईल. मात्र त्याआधी स्वतःच्या घराच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित असणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे हरित ऊर्जेद्वारे विद्युत वाहने चार्जिंग करण्याची सोय देखील उपलब्ध होणार आहे.

छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प आणि विद्युत वाहनांच्या खरेदीसाठी आगाऊ रक्कम योजनेची प्रक्रिया एम्प्लॉई पोर्टलद्वारे पूर्णतः ऑनलाइन आहे व ही रक्कम पूर्ण सेवाकाळात केवळ एकदाच आगाऊ स्वरुपात मिळणार आहे. ◆◆●◆◆

# शून्य विद्युत अपघात धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करा - संचालक राजेंद्र पवार

**कर्मचाऱ्यांच्या** विद्युत अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. आता सार्वजनिक व घरगुती विद्युत अपघातांचे प्रमाण शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शून्य विद्युत अपघात या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करावी, तसेच जिल्ह्यातील जास्तीत जास्त उपकेंद्रांचे 'आयएसओ' मानांकन करावे असे निर्देश संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी दिले.

रत्नागिरी मंडलाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता अनिल डोये, अधीक्षक अभियंता सुनीलकुमार माने, प्र. सहाय्यक महाव्यवस्थापक अजय निकम, औद्योगिक संबंध अधिकारी श्रीकृष्ण वायदंडे, कार्यकारी अभियंते नितीन पळसुलेदेसाई, जितेंद्र फुलपागरे, धनंजय भामरे, प्रमोद बाबरेकर, अनुराधा आंधनसरे उपस्थित होते.

संचालक राजेंद्र पवार म्हणाले, कर्मचाऱ्यांनी वीज यंत्रणेच्या नियमित देखभाल दुरुस्ती सोबतच वीजसुरक्षेचा जागर ग्राहकांच्या घरोघरी करावा. विद्युत धोके टाळण्यासाठी खबरदारी व उपायांची नागरिकांना माहिती द्यावी. ग्राहकांना अधिक चांगली सेवा मिळण्यासाठी तसेच प्रशासकीय कामात सकारात्मक बदल होण्यासाठी उपकेंद्रांचे 'आयएसओ' मानांकन करून घ्यावे. याकरता आवश्यक ती सर्व कार्यवाही करा, असे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी ग्राहकसेवा व वीज बिल थकबाकीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात थकबाकी लक्षणीयरीत्या कमी झाली पाहिजे. याकरता वसुली मोहिमा अधिक तीव्र करा, थकबाकीदार ग्राहकांशी समन्वय साधा. त्यानंतर ही बिल भरणा न झाल्यास नियमानुसार वीज पुरवठा खंडित करण्याची कारवाई करा, असे निर्देश त्यांनी दिले. थकबाकी वसूल झाली तरच आपले भविष्य सुरक्षित असेल, असे त्यांनी नमूद केले. कार्यरत इमारतींची दुरुस्ती, स्वच्छता व आवश्यक सुधारणा करून कर्मचाऱ्यांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्या, अशा सूचना संचालक पवार यांनी दिल्या. ◆◆●◆◆



▸▸ रत्नागिरी मंडलातील अधिकाऱ्यांसमवेत संचालक राजेंद्र पवार, मुख्य अभियंता अनिल डोये, अधीक्षक अभियंता सुनीलकुमार माने आदी.

## 'आयपीपीएआय'च्या राष्ट्रीय परिषदेत

# महावितरणचा सहा पुरस्कारांनी गौरव




इंडिपेन्डंट पॉवर प्रोड्यूसर असोसिएशन ऑफ इंडियाच्या बेळगाव (कर्नाटक) येथील राष्ट्रीय परिषदेत महावितरणला मिळालेले पुरस्कार स्वीकारताना मुख्य अभियंता संदीप पाटील, अधीक्षक अभियंता अमित कुलकर्णी, अनिल गेडाम व सहकारी.

**इंडिपेन्डंट पॉवर** प्रोड्यूसर असोसिएशन ऑफ इंडियाच्या (IPPAI) २६ व्या राष्ट्रीय रेग्युलेटर्स अॅण्ड पॉलिसीमेकर्स परिषदेत महावितरणला ऊर्जा क्षेत्रातील अग्रगण्य आयपीपीएआय पॉवर अवॉर्ड्स-२०२६ मध्ये विविध सहा पुरस्कारांनी गौरविण्यात आले. यात विशेषतः स्मार्ट ग्रिड, रूफटॉप सोलर, बॅटरी स्टोरेज आणि विद्युत वाहन प्रोत्साहन या वर्गवारीमध्ये महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान पटकावले.

'महावितरणने तंत्रज्ञान आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रात घेतलेली झेप विद्युत क्षेत्रात मोठे बदल घडवून आणत आहे. हे पुरस्कार त्याची पावती आहे', अशी प्रतिक्रिया देत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

इंडिपेन्डंट पॉवर प्रोड्यूसर असोसिएशन ऑफ इंडियाच्या (IPPAI) वतीने बेळगाव (कर्नाटक) येथे दि. ७ ते १० जानेवारीला २६ व्या राष्ट्रीय रेग्युलेटर्स अॅण्ड पॉलिसीमेकर्स परिषदेचे आयोजन करण्यात आले. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने केलेल्या विविध कामगिरीचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात आला. यात १) स्मार्ट ग्रिड सोल्यूशन्सच्या अंमलबजावणीसाठी सर्वोत्तम उपयुक्तता (विजेता), २) छतावरील सौर ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देणारे सर्वोत्तम राज्य (विजेता), ३) सर्वोत्तम बॅटरी स्टोरेज प्रकल्प (विजेता), ४) ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा साठवणूक तंत्र- आयटी अप्लिकेशन (नवोपक्रम पुरस्कार), ५) इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणारे सर्वोत्तम राज्य (विजेता) आणि ६) ग्रीन हायड्रोजन आणि अमोनिया नियोजनातील सर्वोत्तम राज्य (उपविजेता) या पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

माजी केंद्रीय मंत्री श्री. सुरेश प्रभू, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे अध्यक्ष घनशाम प्रसाद, ऑल इंडिया डिस्कॉम असोसिएशनचे महासंचालक व केंद्रीय माजी ऊर्जा सचिव अलोक कुमार, पॉवर सिस्टम ऑपरेशन कॉर्पोरेशनचे माजी महासंचालक सुशील कुमार सुनी, राज्याचे सेवानिवृत्त मुख्य सचिव अजोय मेहता यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते महावितरणच्या वतीने मुख्य अभियंता संदीप पाटील, अधीक्षक अभियंता अमित कुलकर्णी, अनिल गेडाम, कार्यकारी अभियंता संजय गवळी, संजय गायकवाड, जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले, उपकार्यकारी अभियंता प्रसाद दिवाण, राजेंद्र सूर्यवंशी, सहाय्यक अभियंता कपिल जाधव, पवन देशपांडे यांनी पुरस्कार स्वीकारले.

या परिषदेत वितरण व पारेषण नियोजन, अक्षय ऊर्जेला (सौर व पवन) प्राधान्याने ग्रीडमध्ये सामावून घेताना येणारा ताण व आव्हाने, मागणीचा अंदाज आणि संसाधन पर्याप्तता नियोजन, बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम्स, वीज वितरण कंपन्यांची आर्थिक स्थिती मजबूत करण्याच्या उपाययोजना, उदयोन्मुख तंत्रज्ञान व आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग आदींवर चर्चा करण्यात आली. राज्य विद्युत नियामक आयोगांचे अध्यक्ष, वीज वितरण, पारेषण, निर्मिती व लोड डिस्पॅच सेंटर्सचे वरिष्ठ अधिकारी, अक्षय ऊर्जा, वित्तीय संस्था आदींचे देशभरातील सुमारे ५०० प्रतिनिधी उपस्थित होते.

# वीज मागणीचा चढता आलेख म्हणजेच प्रगतीचा निर्देशांक : संचालक सचिन तालेवार

**वीज मागणीचा** चढता आलेख हाच प्रगतीचा निर्देशांक आहे, असे प्रतिपादन संचालक (प्रकल्प व संचालन) सचिन तालेवार यांनी केले. तसेच संपूर्ण पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी कंत्राटदारांनी नियम व योजनांबाबत नव्या सूचना, सुधारणा सुचवून सातत्याने संपर्कात राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

विद्युत क्षेत्रातील तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि औद्योगिक क्षमतेचे भव्य दर्शन घडवणाऱ्या तीन दिवसीय 'विद्युत एक्स्पो २०२६'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. दि इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन, नागपूर (TECA) यांच्या वतीने आणि फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (FECAM) यांच्या सहकार्याने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. नागपुरातील सिव्हिल लाईन भागात डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह परिसरात आयोजित प्रदर्शनात वीज क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान, ऊर्जा बचत उपाय, ईव्ही चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर, ट्रान्सफॉर्मर्स, केबल्स, लाईटिंग सोल्युशन्स आदींचे सादरीकरण करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता संभाजी माने होते. मुख्य अभियंता (चाचणी व गुणवत्ता) डॉ. मनीष वाठ, मुख्य अभियंता (नागपूर परिमंडल) दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता (विद्युत निरीक्षण मंडळ) प्रदीप चामट, मुख्य अभियंता (चंद्रपूर परिमंडल) हरिश गजबे, इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष




नागपूर येथे आयोजित 'विद्युत एक्स्पो २०२६'च्या उद्घाटनप्रसंगी संचालक सचिन तालेवार, मुख्य अभियंते शिवाजी माने, डॉ. मनीष वाठ, दिलीप दोडके, हरिश गजबे, अधीक्षक अभियंता प्रदीप चामट आदी.

अनिल मानापुरे, सचिव प्रफुल मोहोड, सहसंयोजक रमेश कनोजिया व अविनाश खाईवाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संभाजी माने यांनी बांधकाम क्षेत्रासोबतच विद्युत अभियांत्रिकी क्षेत्रातही आधुनिकता व तांत्रिक बदल घडून आले असल्याचे सांगितले. डॉ. मनीष वाठ यांनी विद्युत पुरवठ्याला कोणत्याही उद्योगाचा कच्चा माल असे संबोधत विद्युत विभाग व इलेक्ट्रिकल कंत्राटदार हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे नमूद केले. त्यानंतर दिलीप दोडके, प्रदीप चामट आणि हरिश गजबे यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रदर्शनातील विविध स्टॉल्सद्वारे विद्युत व इलेक्ट्रिकल क्षेत्रातील नाविन्यपूर्ण, अत्याधुनिक व सुरक्षित उत्पादने, उपकरणे आणि सोल्यूशन्सची सविस्तर माहिती देण्यात आली. औद्योगिक, निवासी तसेच सार्वजनिक पायाभूत सुविधांसाठी उपयुक्त असलेल्या नव्या तंत्रज्ञानामुळे ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे, खर्चात बचत करणे आणि विद्युत सुरक्षेची पातळी उंचावणे याचे प्रत्यक्ष सादरीकरण या प्रदर्शनात करण्यात आले.

# अधिक चांगल्या ग्राहक सेवांसह वीजबिल वसुलीस प्राधान्य द्यावे

## कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर



नांदेड येथील बैठकीत कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांचे स्वागत करताना मुख्य अभियंता राजाराम माने.

**अधिकाधिक** चांगल्या ग्राहक सेवा देण्याबरोबरच ग्राहकांकडून वापरलेल्या विजेच्या प्रत्येक युनिटच्या बिलाची प्राधान्याने नियमितपणे वसुली करण्याच्या सुचना नांदेड परिमंडलाचे पालक संचालक तथा कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांनी दिल्या. वसुलीच्या कामात हयगय करणाऱ्यांची गय केली जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

नांदेड जिल्ह्यातील वीज ग्राहक समस्या आणि सातत्याने वाढत जात असलेल्या वीजबिल वसुलीच्या कामांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. नांदेड मंडलाच्या झालेल्या बैठकीस मुख्य अभियंता राजाराम माने, प्रभारी अधीक्षक अभियंता विनय घनबहादूर यांच्यासह नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, देगलूर आणि भोकर विभागाचे कार्यकारी अभियंते, सर्व उपकार्यकारी आणि सहायक अभियंते तसेच माहिती तंत्रज्ञान, वित्त व लेखा विभाग, मानव संसाधन विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

दोन सत्रात झालेल्या बैठकीत कार्यकारी संचालक औंढेकर यांनी तांत्रिक आणि अतांत्रिक अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून वीजबिल वसुली कामाचा व्यक्तीगत पातळीवर आढावा घेतला. उपलब्ध मनुष्यबळ आणि त्यांचे योग्यरीतीने उपयोजन करुन सांघिक भावनेतून महसुल वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. नवीन वीज जोडण्या तत्काळ देण्यासह सरासरी वीजदेयके नियंत्रणात आणून चुकीच्या बिलांच्या दुरुस्ती कामास गती देत ग्राहकांच्या नावातील बदलांची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# वीज कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक सुरक्षा साधने देणार: संचालक राजेंद्र पवार

## शून्य अपघाताचे ध्येय : अत्याधुनिक सुरक्षा साधनांचे प्रात्यक्षिक

**वीज कर्मचारी** हा महावितरणचा आधारस्तंभ आहे. तो सुरक्षित असेल तरच अखंडित वीजपुरवठा मिळणार आहे. त्यामुळे वीज कर्मचाऱ्यांच्या जिविताची सुरक्षा ही आपली सर्वोच्च प्राथमिकता आहे. त्यासाठी अत्याधुनिक सुरक्षा साधने खरेदी करण्यात येणार असल्याची माहिती संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी दिली.

सांघिक कार्यालयातर्फे पुणे परिमंडलात दोन दिवशीय अत्याधुनिक सुरक्षा साधनांच्या प्रात्यक्षिकांचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. पहिल्या दिवशी कंपनीत कार्यरत असलेल्या प्रमुख औद्योगिक संघटनांच्या शिखर पदाधिकारी, व्यवस्थापनातील वरिष्ठ अभियंते व अधिकारी यांच्यापुढे रास्तापेठ उपकेंद्रात तर दुसऱ्या दिवशी पद्मावती येथील २२/११ केव्ही उपकेंद्रात परिमंडलातील अभियंते व वीज कर्मचाऱ्यांपुढे सुरक्षा साधनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यावेळी प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता सुनिल काकडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांचेसह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना संचालक पवार म्हणाले, ग्राहकांना अखंडित व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा करणे, हे आपले कर्तव्य आहे. वीजपुरवठा अखंडित राखण्यासाठी यापुढे बिघाड होणार नाहीत, झाल्यास त्याचा कालावधी कमीत कमी असेल, यावर काम करावे लागेल. बाजारात संभाव्य बिघाड ओळखण्याचे नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध आहे. मात्र बाजारातील अत्याधुनिक तंत्रज्ञान व साधन सामुग्री आपल्या यंत्रणेला पुरक आहे का? तसेच त्यात काय बदल करावे लागतील, याची माहिती देण्यासाठी या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या अभिप्रायावर व साधनांच्या उपयोगितेवरच ही साधने खरेदी केली जातील अशी ग्वाही त्यांनी दिली.

पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे म्हणाले, आपण बाजारातून एखादी वस्तू खरेदी करताना वेगवेगळ्या कसोट्या लावून वस्तूची निवड करतो. त्याप्रमाणे प्रत्येकाने सुरक्षा साधनांची उपयोगिता तपासून आपले प्रामाणिक मत नोंदवावे. कारण, ही साधने आपला जीव वाचविणारी आहेत. वापरकर्त्यांची खात्री पटल्याशिवाय व्यवस्थापन पुढे जाणार नाही. तर आभार प्रदर्शन करताना मुख्य अभियंता सुनिल काकडे म्हणाले, अपघात हा क्षणाचा असतो. परंतु, त्यामुळे कुटुंबाची घडी विस्कटते. कायमचे अपंगत्व येते. वीज कर्मचाऱ्यांनी सुरक्षेत तडजोड करु नये.



रास्तापेठ उपकेंद्रात अत्याधुनिक सुरक्षा साधनांच्या प्रात्यक्षिकांची पाहणी करताना संचालक राजेंद्र पवार. समवेत प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता सुनिल काकडे आदी.

सुरक्षा साधनांच्या प्रात्यक्षिकासाठी तौरस पावरट्रॉनिक्स प्रा.लि. तर्फे अनुज अग्रवाल व त्यांच्या चमुने वीज पुरवठा चालू असताना बिघाड शोधण्यासाठी लागणाऱ्या विविध आधुनिक साधनांसह, फोल्डिंग शिडी, बहुउद्देशी रॉड आदींचे सादरीकरण केले. टाटा कंपनीने २२ केव्ही पर्यंतचा वीज रोधक गम बूट सादर केला. याशिवाय महावितरणमधील गणेश वडते व मुबारक पठाण यांनी स्वत: विकसित केलेल्या डिस्चार्ज रॉडचे प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमांच्या आयोजनासाठी उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी विशेष पुढाकार घेतला.

# थकबाकीमुळे खंडित वीज पुरवठा परस्पर जोडणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करा

## कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर यांचे निर्देश



आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर.

**ग्राहकांना** अखंडित, गतिमान व दर्जेदार सेवा देण्यासाठी तसेच विविध योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी वीज देयकांची थकबाकी वसुली अत्यंत आवश्यक आहे. थकबाकीमुळे ग्राहकाचा वीज पुरवठा नियमानुसार खंडित केल्यानंतर परस्पर किंवा बेकायदेशीर वीजजोडणी केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर तत्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश कार्यकारी संचालक (पायाभूत आराखडा) दत्तात्रय पडळकर यांनी दिले.

एकलहरे येथील प्रशिक्षण व सुरक्षा केंद्राच्या सभागृहात आयोजित नाशिक परिमंडलाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. कार्यकारी संचालक पडळकर म्हणाले, प्रत्येक महिनाअखेर शून्य थकबाकी मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी कसोशीने प्रयत्न करावेत. वसुली मोहिमेला अधिक गती द्यावी. ग्राहकसेवा अधिक प्रभावी करण्यासाठी आता देखभाल व दुरुस्ती आणि महसूल तसेच देयके अशी स्वतंत्र विभागणी करण्यात आली असून, यामुळे ग्राहकांना अधिक जलद सेवा मिळणार आहे. यातून कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होणार आहे. ग्राहकांना अखंडित वीज पुरवठ्यासोबतच वापरलेल्या विजेचे दरमहा योग्य रीडिंग घेऊन अचूक वीजबिल देण्यावर भर द्यावा. सर्व प्रकारच्या वीज जोडण्या व इतर सेवा ग्राहकांना ठराविक कालमर्यादेत व तत्काळ दिल्या गेल्या पाहिजेत. विविध योजनांच्या माध्यमातून वीज गळती कमी करणे, वाहिन्या विलगीकरणाचे काम पूर्ण करा असे निर्देश त्यांनी दिले.

या बैठकीला अधीक्षक अभियंते देवेंद्र सायनेकर, राजेश थुल, जगदीश इंगळे तसेच नाशिक व मालेगाव मंडळातील अधिकारी व एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# सातारा जिल्ह्यातील तांबवे सौर प्रकल्पाचे

## संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते उद्घाटन




▸▸ संचालक राजेंद्र पवार यांच्यासमवेत वाई विभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी.

**शेतकऱ्यांना** सिंचनासाठी दिवसा वीज मिळावी, या हेतूने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत आहे. या योजनेतून सातारा जिल्ह्यातील तांबवे (ता.कराड) येथील ४ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचे व ११ केव्ही बे लाईनचे उद्घाटन संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते झाले. या सौर प्रकल्पांमुळे परिसरातील १ हजार १०० शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे.

याप्रसंगी अधीक्षक अभियंता बाळासाहेब हळनोर, कराडचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब मोहिते, उपविभागीय अभियंता स्वप्निल जाधव, शाखा अभियंता विशाल घुटूकडे, मेघा इंजिनिअरिंगचे व्यवस्थापक दयांनद दिवटे यांच्यासह स्थानिक अधिकारी उपस्थित होते. यावेळी तांबवे उपकेंद्रात संचालक पवार यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

नव्याने कार्यान्वित तांबवे सौर प्रकल्प २० एकर जमिनीवर उभारण्यात आला असून ३३/११ केव्ही तांबवे या उपकेंद्राशी जोडण्यात आलेला आहे. या उपकेंद्रावरील १० गावातील १ हजार १०० कृषी ग्राहकांना दिवसा वीजपुरवठ्याची सोय झाली आहे. पोतवे, गमेवाडी, किरपे, आरेवाडी, दक्षिण तांबवे, उत्तर तांबवे, साजूर, डेळेवाडी, येणके, पठारवाडी या गावातील कृषी ग्राहक या सौर प्रकल्पामुळे लाभान्वित झाले आहेत.

### वाई विभागीय कार्यालयास भेट

संचालक राजेंद्र पवार यांनी वाई विभागीय कार्यालयास भेट देऊन स्थानिक अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी संचालक पवार यांनी वीजबिल थकबाकी वसूलीसह विविध योजनांची अंमलबजावणी, ग्राहकसेवा तसेच वाई विभागातील उपविभाग व शाखा कार्यालयाच्या पुर्नरचनेचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी कार्यकारी अभियंता विशाल शिवतरे (वाई), अमित बारटक्के (सातारा) यांच्यासह स्थानिक अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# तत्पर ग्राहकसेवा, महसूलवाढ व शून्य थकबाकीला प्राधान्य द्यावे

## संचालक राजेंद्र पवार यांचे निर्देश

**अभियंता, अधिकारी** व कर्मचाऱ्यांनी तत्पर ग्राहकसेवा, महसूलवाढ व वीजबिलांची शून्य थकबाकी या त्रिसूत्रीला प्राधान्य द्यावे. यासोबतच 'इज ऑफ लिव्हिंग'नुसार (राहणीमान सुलभता) आणि कृती मानकानुसार निश्चित केलेल्या कालावधीत सेवा देण्यासाठी प्रत्येकाने सजग राहावे, असे निर्देश संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी दिले.

नागपूर परिमंडलाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य, संजय वाकडे, अमित परांजपे, स्मिता पारखी, वैभव पातोडे यांच्यासह कार्यकारी अभियंते व विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. संचालक पवार म्हणाले, वीजबिलांच्या वसूलीवरच आपला संपूर्ण आर्थिक डोलारा अवलंबून आहे. त्यामुळे प्रत्येक महिन्यात चालू वीजबिलांची १००टक्के वसूली अपेक्षितच आहे. यासोबतच थकित वीजबिलांच्या वसूलीसाठी विशेष प्रयत्न करावेत. वीजक्षेत्रात काल केलेल्या कामगिरीवर आज तग धरणे शक्य नाही. तसेच सेवा क्षेत्रात कृती मानकांनुसार निश्चित कालावधीत सेवा मिळाली तरच ग्राहकांचे समाधान होते. अशी तत्पर सेवा देण्यासोबतच अचूक बिलींगसह विविध उपाययोजनांमधून महसूल आणखी वाढवणे व वीजबिलांची थकबाकी शून्य करणे यास प्राधान्य देत दैनंदिन कामकाज गतिमान करण्याची सूचना त्यांनी केली.

कर्मचाऱ्यांच्या विद्युत अपघातांचे प्रमाण कमी झाले असले तरी सार्वजनिक व घरगुती विद्युत अपघातांचे प्रमाण शून्यावर आणणे हे उद्दिष्ट आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी आपापल्या क्षेत्रात वीजसुरक्षेचा घरोघरी जागर करावा. विद्युत धोके टाळण्यासाठी खबरदारी व उपायांची नागरिकांना माहिती द्यावी असे संचालक पवार यांनी सांगितले. सर्व वर्गवारीतील ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठ्याची सेवा देण्यासाठी उपकेंद्रांची योग्य निगा, दर्जा व गुणवत्ता ठेवावी तसेच सर्व उपकेंद्रांसाठी 'आयएसओ' मानांकन घेण्याचे प्रयत्न करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



▸▸ नागपूर येथे आयोजित आढावा बैठकीला मार्गदर्शन करताना संचालक राजेंद्र पवार. सोबत मुख्य अभियंता दिलीप दोडके.

या बैठकीत आशियाई विकास बँकेच्या मदतीने होणारे प्रकल्प, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना आणि गतीशक्ती अंतर्गत तांत्रिक कामांसह मानव संसाधन विभागाशी संबंधित विविध विषयांचा संचालक पवार यांनी सविस्तर आढावा घेतला.

# बालसंशोधक अरजित मोरेंच्या वैज्ञानिक दृष्टीला संवादाची जोड

## एनसीएलचे संचालक डॉ. आशिष लेले; 'जिज्ञासा' पुस्तकाचे प्रकाशन




▸▸ बाल संशोधक अरजित अमोल मोरे लिखित 'जिज्ञासा: फ्रॉम क्युरिओसिटी टू क्लॅरिटी' पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. आशिष लेले व संचालक राजेंद्र पवार.

**भारताला** २०४७ पर्यंत एक विकसित देश बनविण्याचे केंद्र सरकारचे उद्दिष्ट आणि सर्वच देशवासीयांचे स्वप्न आहे. ही स्वप्नपूर्ती विज्ञान व तंत्रज्ञानाच्या लोकसंवादाशिवाय साध्य होणार नाही. बाल संशोधक अरजित मोरे याने 'जिज्ञासा' पुस्तकातून वैज्ञानिक दृष्टीला संवादाची जोड दिली आहे. त्यातून शालेय विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, असे मत वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या (सीएसआयआर) राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक डॉ. आशिष लेले यांनी व्यक्त केले.

पुणे येथील एनसीएलच्या सभागृहात शालेय विद्यार्थी अरजित अमोल मोरे याच्या 'जिज्ञासा: फ्रॉम क्युरिऑसिटी टू क्लॅरिटी' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन संचालक डॉ. लेले व महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी एनसीएलचे शास्त्रज्ञ डॉ. वाफिया मसीह, डॉ. नरेंद्र कडू, डॉ. एम. कार्तिकेयन, डॉ. महेश धरणे, डॉ. राकेश जोशी, डॉ. राजेश गोन्नाडे, डॉ. शुभांगी उंबरकर तसेच महावितरणचे अमोल मोरे, डॉ. संतोष पाटणी, निशिकांत राऊत यांची उपस्थिती होती. या पुस्तकाच्या लेखनासाठी अरजित मोरे याचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. पी. गोरे, स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या मुख्याध्यापिका प्रणती मित्रा यांनी कौतुक केले आहे.

शालेय विद्यार्थ्यांना प्रयोगशील शिक्षणाची संधी तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगशाळा अनुभव व प्रयोगशीलतेसाठी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'जिज्ञासा– एक दिवस शास्त्रज्ञ म्हणून' (One Day as a Scientist) हा उपक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार मुंबई येथील शालेय विद्यार्थी अरजित अमोल मोरे याने सीएसआयआरच्या पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेमध्ये एक दिवस वैज्ञानिक म्हणून घालवला होता. या अनुभवावर आधारित त्याने 'जिज्ञासा: फ्रॉम क्युरिऑसिटी टू क्लॅरिटी' या इंग्रजी पुस्तकाचे लेखन केले आहे.

संचालक राजेंद्र पवार यांनी सांगितले की, अरजित मोरे याचे हे पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याने वाचले पाहिजे. विद्यार्थी दशेतील वैज्ञानिक कुतूहल व त्याचे नेमके वास्तव याची मांडणी अरजितने लेखनातून केली आहे. त्यातून शालेय विद्यार्थ्यांना संशोधनासाठी निश्चित प्रेरणा मिळणार आहे. यावेळी सर्व शास्त्रज्ञ व उपस्थितांनी मनोगतातून अरजितच्या जिज्ञासू वृत्तीचे आणि निरीक्षण क्षमतेचे कौतुक केले.

# आर्मी वेलफेअर गृहनिर्माण संस्थेने छतावर उभारला ३६५ किलोवॅट क्षमतेचा सूर्यघर प्रकल्प



▸▸ पुण्यातील साळुंके विहार येथील आर्मी वेलफेअर सोसायटीच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन करताना मुख्य अभियंता सुनिल काकडे. समवेत अधिकारी व सोसायटीचे पदाधिकारी.

**पुणे शहरातील** साळुंके विहार येथील आर्मी वेलफेअर सहकारी गृहनिर्माण संस्थेने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून सोसायटीच्या छतावर ३६५ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारुन विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. या प्रकल्पाचे पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

साळुंके विहार येथील आर्मी वेलफेअर सोसायटीच्या प्रकल्पाचा शुभारंभ प्रसंगी अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर, कार्यकारी अभियंता चंद्रकांत दिघे यांचेसह गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन ब्रिगेडियर एस. टी. नटराजन, सचिव कर्नल बी. डी. शिंदे, व्यवस्थापक ले. कर्नल बी. सी. जोगळेकर, तांत्रिक सदस्य कर्नल आर. मनोहरन, महावितरणचे अति. कार्यकारी अभियंता निलेश रोहनकर, राजेंद्र भुजबळ, किशोर शिंदे, सहा. अभियंता रमाकांत गर्जे व कर्मचारी उपस्थित होते.

रास्तापेठ विभागांतर्गत सैन्यदलातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची साळुंके विहार येथे ३३ एकर क्षेत्रात विस्तीर्ण अशी गृहनिर्माण संस्था आहे. या ठिकाणी ८६७ वीज जोडण्या आहेत. यात ७४६ घरगुती तर इतर १२१ जोडण्यांचा समावेश आहे. सूर्यघर योजनेत १०७ वैयक्तिक ग्राहकांनी त्यांच्या छतावर ३१० किलोवॅट क्षमतेचे प्रकल्प बसविले आहेत. तर पाणीपुरवठ्याचे ४५ किलोवॅट व पथदिव्यांसाठी १० किलोवॅट असा एकूण ३६५ किलोवॅट क्षमतेचा प्रकल्प या संस्थेने साकारला आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता काकडे म्हणाले, 'सैन्यदलातील या सोसायटीने हरित ऊर्जेच्या दिशेने पाऊल टाकले असून, ते इतरांना प्रेरणा देणारे आहे. येणाऱ्या काळात या संस्थेने विजेच्या बाबतीत पूर्णतः स्वावलंबी व्हावे. यासाठी उर्वरित इमारतींच्या छतावरही सौर प्रकल्प बसविण्यास प्राधान्य द्यावे. याकामी महावितरण सर्वोतोपरी सहकार्य करेल.'

टीओडी मीटरमुळे दिवसा वापरलेल्या विजेपोटी ८० पैसे प्रतियुनिटची सवलत मिळते. त्यामुळे गृहनिर्माण संस्थेतर्फे अध्यक्ष नटराजन व तांत्रिक सदस्य आर. मनोहरन यांनी थ्री फेज व टीओडी मीटर बसविण्याची मागणी केली. तेंव्हा मुख्य अभियंता काकडे यांनी तातडीने मीटर बदलण्यासह आवश्यक देखभाल दुरुस्तीचे कामे करणे तसेच वीजभार वाढविण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या.

# महावितरण दैनंदिनी- २०२६ चे उत्साहात प्रकाशन

**महावितरणच्या** २०२६ या वर्षाच्या दैनंदिनीचे मुंबईतील फोर्ट येथील एचएसबीसी कार्यालयात उत्साहात प्रकाशन करण्यात आले. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या शुभहस्ते ही दैनंदिनी प्रकाशित करण्यात आली.

याप्रसंगी संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (वित्त) अनुदीप दिघे, संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक आणि संचालिका ज्योती चिमटे यांची प्रमुख उपस्थिती होती. केवळ तारखा आणि वार पाहण्यासाठीच नव्हे, तर प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठीही दैनंदिनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. या दैनंदिनीमध्ये महावितरणच्या राज्यभरातील क्षेत्रीय कार्यालये व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक, महावितरणची वाटचाल व कामगिरी यांच्या माहितीचा समावेश आहे. या दैनंदिनीमुळे कामकाजात समन्वय राखणे सोपे होणार आहे.

प्रकाशनानंतर, लोकेश चंद्र यांनी उपस्थित सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि ही दैनंदिनी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. दैनंदिनी वेळेत व सुबकपणे प्रकाशित केल्याबद्दल आभा शुक्ला, लोकेश चंद्र यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.



महावितरण दैनंदिनी-२०२६ चे प्रकाशन करताना अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. समवेत संचालक सचिन तालेवार, अनुदीप दिघे, योगेश गडकरी, राजेंद्र पवार, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक आणि संचालिका ज्योती चिमटे.

# मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेची सुवर्ण भरारी

## सोलार ॲग्रो पॉवर कंपनीला राष्ट्रीय पुरस्कार



एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेडला मिळालेला राष्ट्रीय सुवर्ण पुरस्कार स्वीकारताना कार्यकारी संचालक श्रीकांत जलतारे, अधीक्षक अभियंता निखिल मेश्राम.

**राज्यातील** ४५ लाखांवर शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याचे स्वप्न पुर्णत्वास नेणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेडला नवी दिल्ली येथे स्कॉच समूहाच्या वतीने राष्ट्रीय सुवर्ण पुरस्काराने गौरविण्यात आले.

राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या नेतृत्वात एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड अंतर्गत मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीही या योजनेला मोठी गती दिली आहे. या दोहोंच्या नेतृत्वात गेल्या सव्वा वर्षांत ३ हजार ३०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प या योजनेतून कार्यान्वित झाले असून त्याद्वारे राज्यातील ४० लाख एकर शेतजमिनीवर सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे.

देशाच्या विकासामध्ये योगदान देणाऱ्या विविध सार्वजनिक क्षेत्रातील योजना व संस्थांना दिला जाणारा स्कॉच समूहाचा पुरस्कार हा राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र सन्मान आहे. पुरस्कारासाठी ऊर्जा वर्गवारीमध्ये मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या कामगिरीचे विविध तज्ज्ञांकडून मूल्यमापन करण्यात आले. शेतकरी लाभार्थ्यांचे अभिप्राय घेण्यात आले. यासह तज्ज्ञांच्या मतदानाद्वारे देशात प्रथम ठरलेल्या या योजनेला स्कॉच सुवर्ण पुरस्कार जाहीर करण्यात आला. एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेडचे कार्यकारी संचालक श्रीकांत जलतारे व अधीक्षक अभियंता निखिल मेश्राम यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. या योजनेमुळे महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत. या योजनेत आतापर्यंत ३३०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण झाले असून सुमारे ८ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे.



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : भारत पवार • उपसंपादक : विजयसिंह दुधभाते
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)